## एकही बालक लसीकरणापासुन वंचित राहु नये - आयुक्त अकुनुरी नरेश, सिटी टास्क फोर्स समिती आढावा बैठक संपन्न

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**

**चंद्रपूर दि.७ :** मनपा आरोग्य विभागाचे कामकाज व्यवस्थितरीत्या सुरू आहे,सर्व वैद्यकीय अधिकारी यांनी लसीकरण सत्रांना नियमित भेटी द्याव्या तसेच ० ते ५ वर्षे वयोगटातील एकही बालक लसीकरणापासुन वंचित राहु नये यादृष्टीने आरोग्य विभागाने प्रयत्न करण्याचे निर्देश आयुक्त अकुनुरी नरेश यांनी दिले. सिटी टास्क फोर्स समितीची आढावा बैठक गुरुवार २९ जानेवारी रोजी मनपा सभागृहात आयोजित करण्यात आली होती,त्यात ते बोलत होते. बैठकीत वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. नयना उत्तरवार,डॉ. अश्विनी भारत, डॉ.आरवा लाहिरी, डॉ.योगेश्वरी गाडगे, डॉ.शरयु गावंडे, डॉ.नेहा वैद्य,डॉ. जयश्री मालुसरे, डॉ अल्फीया खान, डॉ. समृद्धी वासनिक, डॉ नरेंद्र जनबंधु, डॉ. घोषणा कोराम, शारदा भुक्या, ग्रेस नगरकर उपस्थित होते. डॉ. अश्विनी भारत यांनी नियमित लसीकरण सत्राच्या आयोजनाचे पॉवर पॉईंट द्वारे सादरीकरण केले.चंद्रपूर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातर्फे शहरातील बालकांचे आरोग्य सुरक्षित राखण्यासाठी नियमित लसीकरण मोहीम प्रभावीपणे राबवली जाते. मुलांमध्ये लसीकरणाद्वारे प्रतिबंधित होणाऱ्या आजारांपासून (VPD) संरक्षण मिळावे, यासाठी ही महत्त्वाची आरोग्यसेवा पुरवली जात आहे. या मोहिमेचा मासिक आढावा आयुक्तांद्वारे घेतला जातो. महानगरपालिका कार्यक्षेत्रातील १ ते ७ शहरी प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या माध्यमातून दरमहा १५३ बाह्य लसीकरण सत्रांचे आयोजन करण्यात येते. याशिवाय, महिन्याच्या प्रत्येक बुधवारला आरोग्य केंद्रांमध्ये"श सेविकांद्वारे लसीकरण सत्रे घेतली जातात. ० ते ५ वर्षांपर्यंतच्या बालकांना, तसेच १० आणि १६ व्या वर्षीच्या मुलांना व गरोदर मातांना आवश्यक लसी दिल्या जातात. या लसीकरणात बीसीजी, ओपीव्ही, एचबीव्ही, टीडी, पेंटा, रोटा, आयपीव्ही, पीसीव्ही, डीपीटी, एमआर, जेई यांसारख्या लसींचा समावेश असून, त्या पूर्णपणे मोफत दिल्या जातात. लसीकरणासाठी आवश्यक लस व साहित्य शासन स्तरावरून प्राप्त होते. त्याची योग्य प्रकारे शीतसाखळी प्रणालीद्वारे (ILR) साठवणूक केली जाते. सत्राआधी आशा स्वयंसेविकांमार्फत वॉर्डमध्ये घरोघरी सर्वेक्षण करून वंचित लाभार्थ्यांची यादी तयार केली जाते आणि त्यांना सत्राच्या दिवशी लस दिली जाते.

# आ.मुनगंटीवार यांचा चंद्रपूरच्या सर्वांगीण विकासासाठी ठोस पुढाकार

## गायत्री शक्तिपीठ परिसरातील रस्ते, पार्किंग व सौंदर्यकरणासाठी निर्देश

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**

**चंद्रपूर दि.७ :** शहराचा सुसज्ज आणि सर्वांगीण विकास साधण्याच्या उद्देशाने राज्याचे माजी वने व सांस्कृतिक कार्य मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी श्री वेदमाता गायत्री शक्तिपीठ, दाताळा परिसराची प्रत्यक्ष पाहणी केली. शक्तिपीठ परिसराचा सर्वांगीण विकास होऊन भाविकांना अधिक सोयीसुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी त्यांनी संबंधित कामांना गती देण्याचे निर्देश म्हाडाच्या अधिकाऱ्यांना दिले. या पाहणीदरम्यान रस्ते, पार्किंग, सौंदर्यकरण आणि परिसर विकासाच्या विविध विकासकामांबाबतही त्यांनी सूचना करत विकासाची ठोस दिशा निश्चित केली.



दाताळा येथील श्री वेदमाता गायत्री शक्तिपीठाकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्याचे चौपदरीकरण, पार्किंग व्यवस्था, मंदिर परिसराचे सौंदर्यकरण तसेच गायत्री परिवाराच्या संकल्पनेनुसार बगीचा उभारण्याचे निर्देश त्यांनी नागपूर गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाचे मुख्याधिकारी डॉ. विजय इंगोले यांना दिले. या कामांमुळे परिसराचा विकास होऊन भाविकांना अधिक सोयी उपलब्ध होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.या पाहणी दौऱ्यात नागपूर गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाचे मुख्याधिकारी डॉ. विजय इंगोले, बांधकाम आणि म्हाडा विभागाचे अधिकारी, गायत्री परिवाराचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.यावेळी म्हाडाच्या १७ हेक्टर खुल्या जागेत मुलांसाठी खेळण्याचे गार्डन, ऑक्सिजन पार्क, वृद्धांसाठी बसण्याची व्यवस्था तसेच अंतर्गत रस्त्यांसाठी निधी उपलब्ध करून देण्यासाठी शासनस्तरावर सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे आश्वासन आ. मुनगंटीवार यांनी दिले.चंद्रपूरचा सुसज्ज व आधुनिक विकास साधण्यासाठी आवश्यक निधी शासनस्तरावर उपलब्ध करून देण्याचे आश्वासन आ. मुनगंटीवार यांनी दिले. यावेळी गायत्री परिवाराच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांचे आभार मानत कृतज्ञता व्यक्त केली.दरम्यान पोलिसांसाठी गृहनिर्माण व प्रशिक्षण केंद्रासाठी आवश्यक निधी येत्या मार्चपर्यंत उपलब्ध करून देण्यासाठी पोलीस विभागाशी समन्वय साधून पाठपुरावा करण्याचेही आ.मुनगंटीवार यांनी नमूद केले.नागपूर रोड ते देवाडा शिव हा ३० मीटर रुंदीचा व सुमारे ४.५ किलोमीटर लांबीचा रस्ता उभारण्यासाठी प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना आ.मुनगंटीवार यांनी दिल्या.

# आघाडी धर्म पाळून नामांकन माघार घेणार की,तटस्थ राहणार?

## शिवसेना (उबाठा) च्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**

**चंद्रपूर दि.७ :** महानगरपालिकेतील महापौर निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना (उबाठा) गट महापौरपदाचे नामांकन मागे घेऊन आघाडी धर्म पाळणार का? असा प्रश्न सध्या राजकीय वर्तुळात चर्चेचा केंद्रबिंदू ठरला आहे. आघाडी धर्म पाळत महाविकास आघाडीतील सहकाऱ्यांना पाठिंबा देणार की कोणताही पक्षनिहाय निर्णय न घेता तटस्थ भूमिका स्वीकारणार, हा प्रश्न सध्या ऐरणीवर आला आहे.महापौर निवडणुकीच्या ऐनवेळी शिवसेना (उबाठा) गटाची भूमिका काय असणार, याकडे सर्वच पक्षांचे लक्ष लागले आहे.




महापौर पदासाठी भाजप आणि काँग्रेसकडून संख्याबळ जुळविण्याचे प्रयत्न वेगात सुरू असताना, शिवसेना (उबाठा) गटाची भूमिका 'किंगमेकर' ठरण्याची शक्यता वर्तविली जात आहे. महाविकास आघाडीतील घटक पक्षांमध्ये समन्वयाबाबत चर्चा सुरू असली तरी, स्थानिक पातळीवरील राजकीय समीकरणे आणि अंतर्गत मतभेदांमुळे शिवसेना (उबाठा) गट अद्याप ठोस निर्णयापर्यंत पोहोचलेला नाही.महापौर पदासाठी शिवसेना (उबाठा) कडून नामांकन दाखल करण्यात आले असले, तरी बदलत्या राजकीय समीकरणांमुळे हे नामांकन कायम ठेवले जाणार की माघार घेतली जाणार, याबाबत अनिश्चितता आहे. महाविकास आघाडीतील घटक पक्षांमधील समन्वय, संख्याबळाची गणिते आणि पक्षश्रेष्ठींचे निर्देश या सर्व बाबी लक्षात घेऊन अंतिम निर्णय होणार असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, आघाडी धर्म पाळण्याबाबत शिवसेना (उबाठा) गटात सकारात्मक चर्चा सुरू आहे. काँग्रेस आघाडीतील प्रमुख घटक असल्याने, महापौर पदासाठी काँग्रेसच्या उमेदवाराला पाठिंबा देण्यासाठी शिवसेना (उबाठा) कडून नामांकन मागे घेण्याचा पर्याय गांभीर्याने विचाराधीन असल्याची चर्चा आहे. मात्र, काही स्थानिक नेत्यांकडून स्वतंत्र राजकीय अस्तित्व अधोरेखित करण्यासाठी शेवटपर्यंत रिंगणात राहण्याची भूमिका मांडली जात असल्याने संभ्रम कायम आहे.दरम्यान, शिवसेना (उबाठा) गटाकडून अद्याप अधिकृत भूमिका जाहीर न झाल्याने सत्तास्थापनेसाठी प्रयत्नशील असलेल्या काँग्रेस व भाजप पक्षांचे लक्ष या गटाकडे लागले आहे. शिवसेना (उबाठा) गटाने आघाडी धर्म पाळल्यास महाविकास आघाडीचे पारडे जड होण्याची शक्यता आहे, तर तटस्थ भूमिकेमुळे महापौर निवडणुकीचे गणित पूर्णपणे बदलू शकते.

महापौर निवडणुकीच्या मतदानापूर्वीच शिवसेना (उबाठा) गटाची भूमिका स्पष्ट होण्याची शक्यता वर्तविली जात असून, नामांकन माघार की स्वबळावर लढत?' या निर्णयावरच महानगरपालिकेतील सत्तास्थापनेचे भवितव्य ठरणार असल्याचे राजकीय जाणकारांचे मत आहे.

### सव्वा-सव्वा वर्षाच्या फॉर्म्युल्यावर भाजपाच्या प्रस्तावावर शिवसेना (उबाठा) सोबत चर्चा

महानगरपालिकेतील सत्तास्थापनेच्या पार्श्वभूमीवर सव्वा-सव्वा वर्षांच्या महापौर पदाच्या फॉर्म्युल्यावर भाजपने दिलेल्या प्रस्तावावर शिवसेना (उबाठा) गटासोबत चर्चा झाल्याची माहिती समोर आली आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, सत्तास्थापनेसाठी आवश्यक संख्याबळ जुळविण्यात भाजपला अडचणी येत असल्याने, शिवसेना (उबाठा) गटाला सोबत घेण्याच्या दृष्टीने भाजपकडून सव्वा-सव्वा वर्षांचा फॉर्म्युला पुढे करण्यात आला आहे. या फॉर्म्युल्यानुसार अडीच वर्षांच्या कार्यकाळात पहिली सव्वा वर्षे भाजपचा महापौर तर उर्वरित सव्वा वर्षे शिवसेना (उबाठा) कडून महापौर देण्याचा प्रस्ताव असल्याचे बोलले जात आहे.

या प्रस्तावावर शिवसेना (उबाठा) गटाच्या वरिष्ठ व स्थानिक नेत्यांमध्ये प्राथमिक स्वरूपाची चर्चा झाली असून, अद्याप कोणताही अधिकृत निर्णय जाहीर करण्यात आलेला नाही. शिवसेना (उबाठा) गटाकडून आघाडी धर्म, पक्षाची भूमिका आणि स्थानिक राजकीय वास्तव यांचा सखोल विचार करूनच निर्णय घेण्यात येणार असल्याचे संकेत मिळत आहेत.दरम्यान, भाजपकडून हा प्रस्ताव दिल्याची चर्चा महाविकास आघाडीतील घटक पक्षांमध्येही चर्चेचा विषय ठरली आहे. काँग्रेसकडून या घडामोडींवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत असून, शिवसेना (उबाठा) गटाची भूमिका स्पष्ट होण्याची प्रतीक्षा केली जात आहे. शिवसेना (उबाठा) गटाने भाजपच्या प्रस्तावाला सकारात्मक प्रतिसाद दिल्यास सत्तास्थापनेचे गणित बदलू शकते, तर प्रस्ताव नाकारल्यास भाजपपुढील अडचणी वाढण्याची शक्यता आहे.

## बी.आय.टी. बल्लारपूरच्या सिव्हिल अभियांत्रिकी विभागाच्या विद्यार्थ्यांना एमएसबीटीई पीपीटी सादरीकरण स्पर्धेत द्वितीय क्रमांक

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**

**चंद्रपूर दि.७ :** बल्लारपूर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, बल्लारपूर येथील सिव्हिल अभियांत्रिकी विभागाच्या विद्यार्थ्यांनी बजाज पॉलिटेक्निक, चंद्रपूर येथे आयोजित महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ (श्एँऊ) अंतर्गत पीपीटी सादरीकरण स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन करत द्वितीय क्रमांक पटकावला. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल विद्यार्थ्यांना १० हजार रोख पारितोषिक प्रदान करण्यात आले.




या प्रतिष्ठित तांत्रिक स्पर्धेत विविध पॉलिटेक्निक महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. या स्पर्धेत बल्लारपूर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे तृतीय वर्ष सिव्हिल अभियांत्रिकीचे विद्यार्थी सुरंजन बर्मन व पियुष काळे यांनी संस्थेचे प्रतिनिधित्व केले. त्यांनी आपल्या विषयाचे सखोल तांत्रिक ज्ञान, प्रभावी सादरीकरण कौशल्य व आत्मविश्वासपूर्ण मांडणीद्वारे परीक्षकांचे लक्ष वेधून घेतले.या यशामागे संस्थेचे प्राचार्य श्रीकांत गोजे यांचे प्रेरणादायी नेतृत्व व तांत्रिक उपक्रमांना दिलेले सतत प्रोत्साहन महत्त्वाचे ठरले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी ते नेहमीच मार्गदर्शन करत असतात. तसेच सिव्हिल अभियांत्रिकी विभागप्रमुख आकाश गाईन यांनी विद्यार्थ्यांना संपूर्ण तयारीदरम्यान मोलाचे मार्गदर्शन, आवश्यक सुविधा व सातत्यपूर्ण पाठबळ प्रदान केले.विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाच्या तयारीसाठी विशेष मेहनत घेतल्याबद्दल प्रा. प्रतीक्षा बरसे मॅडम यांचे मोलाचे सहकार्य लाभले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांच्या प्रयत्नांना योग्य दिशा मिळाली व त्याचेच हे यशस्वी फलित असल्याचे नमूद करण्यात आले.या यशामुळे बल्लारपूर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या शैक्षणिक गुणवत्तेचा व तांत्रिक कौशल्य विकासाचा प्रत्यय पुन्हा एकदा आला आहे. संस्थेच्या व्यवस्थापन, प्राचार्य, प्राध्यापक वर्ग व विद्यार्थ्यांनी विजेत्या विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले असून, भविष्यातही अशाच प्रकारे विविध शैक्षणिक व तांत्रिक स्पर्धांमध्ये यश संपादन करण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## वरोरा येथे प्रशिक्षण व संचालकाचा सत्कार समारंभ

### बँकेच्या कर्ज धोरण पुस्तकाचे प्रकाशन

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**

**चंद्रपूर दि.७ :** चंद्रपुर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आणि चंद्रपुर जिल्हा देखरेख सहकारी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने सेवा सहकारी संस्थांच्या संचालकांसाठी विशेष प्रशिक्षण शिबिर आणि सत्कार समारंभाचे आयोजन दि ८ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता वरोरा येथील शेतकरी भवनातील दादासाहेब देवतळे सभागृहात करण्यात आले आहे. प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटक म्हणून जिल्हा उपनिबंधक जयकुमार ठाकूर तर मार्गदर्शक म्हणून प्रबंध संस्था नागपूरचे धनंजय गाडगीळ चे डॉ.प्रशांत शिर्के, डॉ.सीमा मिश्रा, जिल्हा विकास व्यवस्थापक नाबार्ड चंद्रपुर चे तृणाल फुलझेले तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत.

चंद्रपुर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सर्व संचालकांचा व संचालीकांचा सत्कार सोहळयाला उद्घाटक म्हणून आमदार कीर्तीकुमार भांगडिया तर अध्यक्षस्थानी चंद्रपुर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष रवींद्र शिंदे तर प्रमुख पाहुणे म्हणून खासदार प्रतिभाताई धानोरकर, माजी केंद्रीय गृहराज्यमंत्री हंसराज अहीर, आमदार किशोर जोरगेवार, आमदार करण देवतळे, बँकेचे उपाध्यक्ष संजय डोंगरे, उद्योजक प्रकाशबाबू मुथा उपस्थित राहणार आहेत. याच कार्यक्रमात बँकेच्या कर्ज धोरणाचे पुस्तक प्रकाशीत करण्यात येणार आहे.तरी कार्यक्रमासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन कार्यक्रमाचे संयोजक विभागीय कर्ज समितीचे अध्यक्ष जयंतराव टेमुर्डे आणि बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेश्वर भि. कल्याणकर चंद्रपुर जिल्हा देखरेख सहकारी संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गणेश काळे यांनी केले आहे.

## डॉ.खत्री महाविद्यालयात आठवणीच्या साक्षीने १२ वी विद्यार्थ्यांचा निरोप

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**

**चंद्रपूर दि.७ :** स्थानिक डॉ. खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर येथील कनिष्ठ महाविद्यालयातील वाणिज्य शाखेच्या इयत्ता १२ वी च्या विद्यार्थ्यांसाठी निरोप समारंभ अत्यंत भावूक आणि मंगल वातावरणात संपन्न झाला. हसऱ्या चेहेऱ्यामागे दडलेली विरहाची हलकीशी कळ प्रत्येकाच्या मनात झळकत होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. एम. काकडे होते तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. रवी वाळके, प्रा. सुप्रिया सादलवार, प्रा. डॉ. ज्योत्सना मोहितकर, प्रा. सुवर्णा राऊत, प्रा. जिवतोडे, प्रा. अर्चना नागपूरे, प्रा. पुजा शंखारी, प्रा. वैशाली काटकर यांची मंचावर उपस्थिती होती.या प्रसंगी प्राचार्य म्हणाले की, विद्यार्थ्यांनो आपण १२ वी ला जरी असलो तरीपण या महाविद्यालयातील आठवणी, संस्कार, शिक्षकांचे मार्गदर्शन तुमच्या आयुष्यभर सोबत राहील. यशाच्या शिखरावर पोहचतांना या महाविद्यालयाचे नांव उज्वल करा. प्रमुख अतिथी प्रा. सुप्रिया सादलवार, डॉ. ज्योत्सना मोहितकर यांप्रसंगी म्हणाल्या की, विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहण्याचा व ती पूर्ण करण्याचा संदेश दिला. कु. युक्ती डाखरे, कु. रुतुशा कोहपरे या विद्यार्थ्यांनी आपल्या शालेय जिवणातील आठवणी सांगतांना शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. काही विद्यार्थ्यांचे डोळे पाणावले होते. शाळा म्हणजे आमच्यासाठी दुसरे घरच होते असे सांगतांना वातावरण स्तब्ध झाले. विद्यार्थ्यांनी वर्षभर मिळवलेल्या यशाबद्दल त्यांना बक्षिसे देवून शुभेच्छा देण्यात आल्या. सांस्कृतिक कार्यक्रमात सादर केलेल्या गीतांनी आणि निरोप गीतांनी सर्वांना भावूक केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु. सलोनी मोहुर्ले हिने केले तर आभार कु. अर्पिता येरगुडे हिने मानले. हा निरोप समारंभ विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील एक हृदयस्पर्शी क्षण ठरला.



### जिल्ह्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा

**युवाराष्ट्र दर्शन/ प्रतिनिधी**

**चंद्रपूर दि.७ :** राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारामुळे चंद्रपूर जिल्ह्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना आधारभूत किंमत योजनेंतर्गत धानाचे प्रलंबित चुकारे तातडीने मिळावेत, यासाठी आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री ना. छगनजी भुजबळ यांना पत्र लिहीले होते.

## महाशिवरात्री निमित्त आयोजित नियोजन बैठक संपन्न



**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**

**चंद्रपूर दि.७ :** आगामी महाशिवरात्री उत्सवाच्या पार्श्वभूमीवर लाल पेठ येथील महाराष्ट्रातील सर्वात मोठे आणि क्ष्प्राचीन अशी ओळख असलेल्या महाशिवलिंग मंदिरात नियोजन बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीस उपस्थित राहून उत्सवाच्या अनुषंगाने आयोजित करण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांबाबत महत्त्वपूर्ण सूचना दिल्या.तसेच, महाशिवरात्रीनिमित्त मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी स्वच्छता, सुरक्षा, पाणी, वाहतूक व इतर आवश्यक सोयी-सुविधा योग्य प्रकारे उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने सविस्तर नियोजन करण्याचे निर्देश दिले. चंद्रपूर जिल्ह्यात महाशिवरात्रीसह इतरही धार्मिक सण व उत्सव मोठ्या उत्साहात साजरे केले जातात. त्यामध्ये महाशिवरात्रीचा सण विशेष महत्त्वाचा असून दरवर्षी मोठ्या भक्तिभावाने साजरा केला जातो.या अनुषंगाने आयोजित करण्यात आलेल्या या नियोजन बैठकीस सामान्य नागरिक तसेच भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पालकमंत्र्यांच्या हस्ते राणी हिराई उमेद मार्टचे उद्घाटन

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**

**चंद्रपूर दि.७ :** ग्रामीण भागातील महिलांच्या उत्पादनांना बाजारपेठ मिळावी, त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने ग्रामीण जिवनोन्नती अभियान (उमेद) जि.प. च्या वतीने तयार करण्यात आलेल्या राणी हिराई उमेद मार्टचे उद्घाटन राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक वुईके यांच्या हस्ते करण्यात आले.



ज्युबली हायस्कूल परिसर, चंद्रपूर येथे पार पडलेल्या या कार्यक्रमाला आमदार किशोर जोरगेवार, आमदार करण देवतळे, जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह, जिल्हा पोलिस अधीक्षक मुमक्का सुदर्शन, मनपा आयुक्त अकुनुरी नरेश, प्रकल्प संचालक मंजिरी टकले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी नूतन सावंत, जिल्हा अभियान व्यवस्थापक प्रवीण भांडारकर आदी उपस्थित होते.

राणी हिराई उमेद मार्ट हे अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज असून येथे ग्रामीण भागातील महिलांनी उत्पादित केलेले ब्रँड्सची विविध दुकाने उपलब्ध आहेत. तसेच अद्ययावत फूड कोर्ट, कॅफे, आवश्यक सुविधा आणि कुटुंबांसाठी आकर्षक वातावरण निर्माण करण्यात आले आहे.

त्यामुळे नागरिकांना खरेदी व मनोरंजनाचा दर्जेदार अनुभव मिळणार आहे. राणी हिराई उमेद मार्टमुळे ग्रामीण भागातील महिलांच्या उत्पन्नात वाढ होईल. चंद्रपूरवासीय जनतेने राणी हिराई उमेद मार्टमधे येऊन महिलांनी उत्पादित केलेल्या वास्तूची खरेदी करून त्यांच्या आनंदात सहभागी व्हावे, असे आवाहन मंजिरी टकले यांनी केले.

यावेळी मान्यवरांनी महिलांनी तयार केलेल्या विविध उत्पादनांची पाहणी केली व संवाद साधला. कार्यक्रमाला उमेदचे तालुका व्यवस्थापक गजानन भिमटे, रोशन साखरेसंदीप घोंगे, शितल गर्गेलवार, मोहित नैताम, नरेंद नगराळे, अर्चना बोनसुले, उद्धव मडावी, विवेक हरणे, राजेश दुधे, अमोल मोडक, हेमचंद बोरकर, वसीम काझी आदी उपस्थित होते.

### दोन सफारी वाहनांचे लोकार्पण

करवा सफारी गेट येथे स्थानिक महिलांसाठी रोजगारनिर्मिती करणे व ईको - टुरिझमला चालना देणे या उद्देशाने प्रधानमंत्री खनीज क्षेत्र कल्याण योजनेअंर्गत जिल्हा परिषदेच्या वतीने खरेदी करण्यात आलेल्या दोन सफारी वाहनांचे लोकार्पण राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक वुईके यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आमदार सर्वश्री सुधीर मुनगंटीवार, किशोर जोरगेवार, करण देवतळे, जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह उपस्थित होते.

## संस्कार भारती चंद्रपूरचे भारतमाता पूजन आणि महर्षी भरतमुनी जयंती ११ जानेवारी रोजी

**युवाराष्ट्र दर्शन/ प्रतिनिधी**

**चंद्रपूर दि.७ :** संस्कार भारती चंद्रपूरच्या वतीने दि. ११ जानेवारी २०२६ रोजी रोजी भारतमाता पूजन आणि महर्षी भरतमुनी जयंती साजरी करण्यात येणार आहे.दि. ११ जानेवारी रोजी सायंकाळी ६ वाजता हॉस्पिटल वॉर्ड चंद्रपूर येथील डॉ श्यामाप्रसाद मुखर्जी वाचनालय सभागृहात आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पसायदान ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष श्री प्रकाशराव गुंडावार राहतील. प्रमुख अतिथी या नात्याने दै तरुण भारतचे जिल्हा प्रतिनिधी संजय रामगीरवार उपस्थित राहतील. प्रमुख वक्ते म्हणून नागपूरचे इतिहास अभ्यासक प्रवीण योगी उपस्थित राहतील.

# बालांगण

## जग ऑटोमेटेड कार्सचं



रंजक विज्ञान

आजकाल आपण ऐकतो की काही गाड्या स्वतःहून चालतात. या गाड्यांमध्ये ड्रायव्हर नसतो. अशा गाड्यांना ऑटोमेटेड कार्स म्हणतात. म्हणजेच गाडी चालवण्यासाठी नेहमी माणसाने स्वत: स्टीअरिंग धरायलाच हवे, असे नाही. ही गोष्ट जादूसारखी वाटते खरी, पण यामागे विज्ञान आणि संगणक यांचा मोठा वाटा आहे.

या प्रकारच्या कार्स आजूबाजूचे जग पाहू आणि समजू शकतात. त्यासाठी गाडीवर कॅमेरे, सेन्सर आणि अंतर मोजणारी उपकरणे बसवलेली असतात. ही उपकररणे रस्ता, सिग्नल, समोरची वाहने, माणसे, प्राणी आणि अडथळे ओळखतात. ही सगळी माहिती गाडीतील संगणकाकडे जाते. तो संगणक फार वेगाने ठरवतो की गाडी थांबवायची, हळू चालवायची की वळण घ्यायचे.

टेस्ला ही अशी गाडी बनवणारी एक प्रसिद्ध कंपनी आहे. टेस्लाची कार रस्त्यावर चालताना सतत निरीक्षण करते. समोर गाडी आली तर अंतर ठेवते. सिग्नल लाल असेल तर थांबते. समोरचा रस्ता मोकळा असेल तर पुढे जाते. चालक गाडीत असतोच. पण अनेक वेळा गाडी स्वतः निर्णय घेते. अर्थात आत बसलेल्या माणसाचे लक्ष रस्त्यावर असणे महत्त्वाचे असते.

फक्त टेस्लाच नाही, तर अजूनही अनेक कंपन्या अशा गाड्या बनवत आहेत. बायडू अपोलो गो ही चीनमधली कंपनी स्वतंत्रपणे रस्त्यावर रोबोटॅक्सी चालवते आहे. या कंपनीच्या गाड्या अनेक शहरांमध्ये ऊबरसारख्या सेवा देत आहेत. याशिवाय काही कंपन्या स्वतः चालणाऱ्या टॅक्सी तयार करत आहेत. काही गाड्या सामान पोहोचवण्यासाठी वापरल्या जात आहेत. मोठ्या कार कंपन्याही हळूहळू अशा प्रकारचे तंत्रज्ञान आपल्या गाड्यांमध्ये बसवत आहेत.

भविष्यात या कार्स अजून हुशार होतील. त्या पाऊस, धुके किंवा अंधारातही नीट चालतील, अपघात टाळतील आणि रहदारीचे धोके कमी करतील. तरीसुद्धा रस्ता खरा असतो आणि चूक झाली तर परिणाम गंभीर असू शकतात. म्हणूनच तंत्रज्ञान कितीही आधुनिक आणि प्रगत असले तरी जबाबदारी आणि सावधपणा माणसाने ठेवायला हवाच.

## बहुपयोगी तांबे

तांबे हे एक महत्त्वाचे खनिज आहे. ते निसर्गात म्हणजेच जमिनीत आणि दगडांमध्ये सापडते. तांब्याचा रंग लालसर तपकिरी असतो. ते सहज वाकवता येते. म्हणूनच माणसांनी खूप वर्षांपूर्वीपासून तांब्याचा वापर सुरू केला. तांबे टिकाऊ असते. ते गंजत नाही. धातूच्या या गुणांमुळे ते उपयोगी मानले जाते.



माहिती खनिजांची

तांबे जगाच्या अनेक भागात सापडते. भारतात तांबे प्रामुख्याने राजस्थान, झारखंड आणि मध्य प्रदेश या राज्यांमध्ये आढळते. राजस्थानमधील खेतडी परिसर, झारखंडमधील सिंहभूम भाग आणि मध्य प्रदेशातील मलाजखंड हे तांब्याच्या खाणींसाठी प्रसिद्ध भाग आहेत. इतर देशांत चिली, पेरू, चीन आणि अमेरिका येथे मोठ्या प्रमाणावर तांबे मिळते. जमिनीत सापडणारे तांबे थेट वापरता येत नाही. ते खडकांमध्ये मिसळलेले असते. त्यामुळे आधी खाणींतून खडक बाहेर काढले जातात. हे खडक लहान तुकड्यांत फोडून त्यातील तांबे वेगळे केले जाते. नंतर ते प्रचंड उष्णतेवर तापवून शुद्ध केले जाते. या प्रक्रियेत माती, दगड आणि इतर अशुद्ध पदार्थ बाजूला होतात आणि शुद्ध तांबे मिळते. तांबे अधिक शुद्ध व्हावे यासाठी काही ठिकाणी वीजेचा वापर केला जातो.

शुद्ध तांबे अनेक कामांसाठी वापरले जाते. वीज वाहून नेण्याची क्षमता तांब्यात असते. त्यामुळे घरातील वीजवाहिन्या तांब्यापासून बनवल्या जातात. मोबाईल, टीव्ही, संगणक आणि इतर इलेक्ट्रॉनिक वस्तूंमध्ये तांबे वापरले जाते. पाणी वाहण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या नळांमध्येही तांब्याचा वापर होतो. तांब्याची भांडीही बनवली जातात. त्यातील काही विशिष्ट गुणधर्मामुळे तांब्याच्या भांड्यात पाणी ठेवलं तर ते काही प्रमाणात शुद्ध राहते असे मानले जाते. नाणी, तार, मोटारगाड्यांचे भाग आणि छप्पर बनवण्यासाठीही तांब्याचा उपयोग केला जातो. तांबे इतर धातूंमध्ये मिसळून पितळ आणि कांस्य यासारखे मिश्रधातू तयार केले जातात.

एकूणच तांबे हे माणसाच्या दैनंदिन जी–वनात खूप उपयोगी असलेले खनिज आहे. त्यामुळे त्याचा जपून आणि योग्य वापर करणे खूप महत्त्वाचे आहे.

## विंध्य पर्वतरांग

ओळख पर्वतांची

विंध्य पर्वतरांग ही भारतातील एक महत्त्वाची पर्वतरांग आहे. ही भारतातील प्राचीन पर्वतरांगांपैकी एक मानली जाते. ही पर्वतरांग उत्तर भारत आणि दक्षिण भारत यांना वेगळी करणारी नैसर्गिक सीमा आहे. विंध्य पर्वतरांग गुजरातपासून सुरू होऊन मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश आणि बिहारपर्यंत पसरलेली आहे. तिची सरासरी उंची सुमारे तीनशे ते सहाशे मीटर आहे. ही पर्वतरांग हिमालयासारखी अजूनही वाढत नाही. त्यामुळे तिचे डोंगर गोलसर आणि कमी उंचीचे दिसतात. ही प्रामुख्याने कठीण खडकांनी बनलेली आहे. विंध्य पर्वतरांग म्हणजे सलग उंच डोंगर नाहीत, तर काही ठिकाणी उंचसखल जमीन आणि काही ठिकाणी सपाट माथ्याचे डोंगर यांचा समूह आहे. म्हणून काही भागांत ती पठारासारखी वाटते. विंध्य पर्वतरांगेच्या उत्तरेकडील नद्या गंगा खोऱ्याकडे वाहतात तर दक्षिणेकडील नद्या नर्मदा खोऱ्यात मिळतात. या पर्वतरांगेतून अनेक नद्या उगम पावतात. नर्मदा, सोन, तापी आणि केन या नद्यांचे उगम विंध्य परिसरात आहेत. नर्मदा नदी विंध्य



आणि सातपुडा पर्वतरांगांमधून वाहते आणि पश्चिमेकडे जाऊन अरबी समुद्राला मिळते. त्यामुळे या पर्वतरांगेचा जलसंपत्तीच्या दृष्टीने मोठा उपयोग होतो.

विंध्य पर्वतरांग परिसरात विविध प्रकारची वनसंपदा आढळते. साग, साल, बांबू यांसारखी झाडे येथे मोठ्या प्रमाणावर दिसतात. या जंगलांमध्ये वाघ, चित्ता, अस्वल, हरिण, माकड यांसारखे अनेक प्राणी राहतात. त्यामुळे हा भाग जैवविविधतेसाठी महत्त्वाचा आहे. इतिहासाच्या दृष्टीनेही विंध्य पर्वतरांग महत्त्वाची आहे. प्राचीन काळात उत्तर भारत आणि दक्षिण भारत यांमधील प्रवास या पर्वतरांगांमुळे कठीण होता. त्यामुळे संस्कृती, भाषा आणि जीवनशैली यांत फरक निर्माण झाला. अनेक राजवटींच्या सीमा विंध्य पर्वतरांगेजवळ होत्या. रामायण आणि महाभारतातही विंध्य पर्वतरांगेचा उल्लेख आढळतो.

आजही विंध्य पर्वतरांग परिसरात शेती, खाणकाम आणि वनव्यवसाय चालतो. चुनखडी, कोळसा आणि इतर खनिजे येथे सापडतात. एकूणच विंध्य पर्वतरांग ही भारताच्या भूगोल, इतिहास आणि निसर्गसंपत्तीच्या दृष्टीने खूप महत्त्वाची आहे.

## बनवा ध्रुवीय अस्वल

करून तर पाहा

आपल्याला थोडी थंडीसुद्धा सहन होत नाही. मग बर्फाळ प्रदेशात राहणाऱ्या प्राण्यांचं काय? अंटार्टिका खंडात खूप बर्फ असतो. पेंग्विन, पोलर बेअर (ध्रुवीय अस्वल) यांसारखे प्राणी तिथे राहतात. थंडीपासून बचाव करण्यासाठी निसर्गानेच त्यांच्या शरीराची रचना विशिष्ट पद्धतीने केलेली असते. पेंग्विन, ध्रुवीय अस्वलासारखे प्राणी आपण टिव्हीवरच बघू शकतो. पण असे प्राणी तुम्ही तयार करू शकता. ध्रुवीय अस्वलाची कलाकृती साकारूया...



**साहित्य :** कार्डपेपर, कापसाचे बोळे, गम, गुगली आईज, पॉम पॉम, मार्कर

**कृती :** कार्डपेपरवर मध्यम आकाराचं वर्तुळ काढा. आता या वर्तुळाच्या वरच्या बाजूला कानांच्या जागी दोन छोटी वर्तुळं काढायची आहेत. कप किंवा छोट्या वाटीच्या मदतीने तुम्ही ही वर्तुळं काढू शकता. हे आकार कापून घ्या. आता गोल आकाराच्या कार्डपेपरवर गम लावा. गम सगळीकडे नीट पसरवून घ्या. आता तुमच्याकडचे कापसाचे बोळे घ्या. हे बोळे वर्तुळावर चिकटवायचे आहेत. गम नीट वाळू द्या. डोळ्यांच्या जागी गुगली आईज चिकटवा. नाकाच्या जागी पॉप पॉम चिकटवा. झालं तुमचं पोलर बेअर तयार.

## बना अनुवादक

कोण होणार?

जग जवळ येत आहे. शिक्षण, नोकरी, व्यवसाय तसंच इतर कारणांमुळे लोक परदेश प्रवास करतात. आज इंग्रजीचा वापर होत असला तरी जगभरात असे अनेक देश आहेत जिथे मातृभाषेला प्राधान्य दिलं जातं. अशा देशांमधले लोक भारत किंवा इतर देशात जातात तेव्हा संवाद साधण्याचा अडसर निर्माण होतो. अनुवादक हा अडसर दूर करतो. विविध भाषा शिकून तुम्हीही या क्षेत्रात करीअर करू शकता. उत्तम अनुवादक बनण्यासाठी तुम्हाला भाषेची उत्तम जाण असायला हवी. भाषेसोबतच त्या देशातल्या संस्कृतीची माहिती असणं गरजेचं आहे. इंग्रजीसह विविध भाषांमधल्या पुस्तकांचा अनुवाद तुम्ही करू शकता. अनुवादक म्हणून पर्यटनाच्या क्षेत्रातही खूप संधी आहेत. विविध देशांमधून भारतात पर्यटनासाठी येणाऱ्या पर्यटकांना मार्गदर्शन करण्याचं काम दुभाषा किंवा अनुवादक करू शकतो. पुस्तकांचा अनुवाद करायचा असेल तर भाषांवर पकड असणं गरजेचं आहे. मूळ लेखनाचा लहेजा कायम ठेवणं आवश्यक असतं.



अनुवादक म्हणून काम करताना भाषा बोलता, लिहिता आणि वाचता येण्यासोबतच धैर्य आणि स्थैर्यही गरजेचं आहे. हिंदी, इंग्रजीशिवाय इतर भाषांमधलं साहित्य तुम्ही मातृभाषेत आणू शकता. भारतात अनेकविध भाषा बोलल्या जातात. प्रत्येक राज्यात साहित्याची परंपरा आहे. हे साहित्य आपल्या मातृभाषेत आणण्याचं काम यानिमित्ताने करता येईल. परकीय भाषांमधल्या साहित्याचा अनुवादही तुम्ही करू शकता.

मुंबई विद्यापीठ, पुणे विद्यापीठ, जवाहरलाल नेहरू विद्यापीठ यांसह अनेक खाजगी संस्थांमध्ये विविध भाषा शिकवल्या जातात.

## डोळे जपा

आय केअर

तुमच्या बऱ्याच मित्रमैत्रिणींना चष्मा लागला असेल. लहान वयात चष्मा लागण्याचं प्रमाण आजकाल खूप वाढलं आहे. तुम्ही मुलं स्मार्टफोन वापरता. लॅपटॉप, कॉम्प्युटरला डोळे लाऊन बसलेले असता. या सगळ्याचा डोळ्यांवर खूप ताण येतो. त्यामुळे डोळ्यांची काळजी घेणं सर्वात जास्त गरजेचं आहे. पोषक आहार घेऊन डोळ्यांचं आरोग्य राखता येतं. मग तुम्हीही न कंटाळता पोषक आहार घ्यायला सुरुवात करा. डोळ्यांच्या आरोग्यासाठी काय चांगलं? पाहुया...

* पालक, मेथीसारख्या पालेभाज्या खा. या पालेभाज्यांकडे बघून नाक मुरडू नका. पालकात बीटा केरोटिन, क जीवनसत्त्व तसंच इतर पोषक घटक असतात. या घटकांमुळे सूर्याच्या घातक किरणांपासून डोळ्यांचं रक्षण होतं.

* काजू, बदाम, जर्दाळूसारखा सुका मेवा आणि सूर्यफुलाच्या बियांमधून शरीराला ई जीवनसत्त्व मिळतं. हे ई जीवनसत्त डोळ्यांसाठी खूप गरजेचं असतं. ई जीवनसत्त्वामुळे डोळ्यांच्या अनेक समस्या दूर होतात. डोळ्यांचं आरोग्य उत्तम राहतं.

* आंबट फळांमध्ये क जीवनसत्त्व असतं. क जीवनसत्त्वामुळे डोळ्यांचे टिश्यू बळकट होतात. त्यामुळे संत्र, मोसंब, लिंबू यांसारखी फळं खा.

* डोळ्यांचं आरोग्य राखण्यासाठी गाजर खाण्याचा सल्ला दिला जातो. यात बीटा केरोटिन असतं. यामुळे डोळ्यांचं रक्षण होतं.

* लाल, पिवळ्या, हिरव्या भोपळी मिरच्या म्हणजे पोषक घटकांचा खजिना आहे. त्यामुळे त्या बाजूला काढून टाकू नका. यातल्या पोषक घटकांमुळे डोळे चांगले राहतात. दृष्टी सुधारते.



## फरक प्रिंटर्समधला

स्मार्ट नॉलेज

प्रिंटिंगच्या गरजा लक्षात घेऊन घरच्या घरी झटपट प्रिंट काढण्यासाठी वेगवेगळे प्रिंटर बाजारात उपलब्ध आहेत. हे प्रिंटर कॉम्प्युटर लॅपटॉपला किंवा मोबाईलला कनेक्ट करून सहज प्रिंट्स काढता येतात. प्रिंटरमध्ये लेझर आणि इंकजेट असे दोन प्रकार पहायला मिळतात. लेझर आणि इंकजेट या दोन्ही प्रकारांची स्वत:ची वैशिष्ट्य आहेत. याबाबत माहिती घेऊया...



रंगीत प्रिंटससाठी इंकजेट प्रिंटर उपयुक्त ठरतात. या प्रिंट्च्या मदतीने रंगीत प्रिंटस घेता येतात. तसंच फोटोच्या प्रिंट्सही तुम्ही घेऊ शकता.तर लेझर प्रिंटच्या मदतीने कागदपत्रांच्या प्रिंट्स घेतल्या जातात. लेझर प्रिंटरमधून काढलेल्या प्रिंटमधली अक्षरं अगदी स्पष्ट दिसतात. तर इंकजेट प्रिंटरमध्ये ती थोडी धुरकट दिसतात.

या दोन्ही प्रिंटरची काम करण्याची पद्धत पूर्णपणे वेगळी आहे. या दोहोंमध्ये वेगळ्या कार्टेजचा वापर केला जातो. लेझर प्रिंटरमध्ये टोनर कार्टेजचा वापर केला जातो. तर इंकजेटमध्ये इंक कार्टेजचा वापर केला जातो. इंकजेट प्रिंटरचा वापर तुलनेने बराच सोपा आहे. तर लेझर प्रिंटरचं तंत्रज्ञान थोडं अवघड आहे. लेझर प्रिंटरचा वापर करण्यासाठी जास्त पैसे खर्च करावे लागतात. इंकजेट प्रिंटर छोट्या जागेत अगदी सहज मावतो. तर लेझर प्रिंटरला जास्त जागा लागते. लेझर प्रिंटरचं काम झटपट चालतं. तर इंकजेट प्रिंटरला थोडा वेळ लागतो. तसंच इंकजेट प्रिंटरमध्ये सतत कागद बदलत बसावा लागतो.

इंकजेट प्रिंटरच्या तुलनेत लेझर प्रिंटर जास्त चांगल्या प्रकारे काम करतो.


## रो-रो फेरी म्हणजे नक्की काय?

माहित आहे?

रो–रो फेरी सेवा म्हणजे नेमकं काय, याविषयी जाणून घेऊया...

रो–रो म्हणजे रोल ऑन रोल ऑफ फेरी सेवा. गुजरातमधल्या घोघा आणि दहेज या बंदरांदरम्यान ही सेवा सुरू आहे. विशेष म्हणजे दक्षिण आशियातली ही अशाप्रकारची पहिलीच सुविधा आहे. अशी सेवा सुरू करण्याचा मान भारताला मिळाला ही बाब आपल्या प्रत्येकासाठी अभिमानास्पद म्हणावी लागेल. मध्ये समुद्र किंवा नदी असेल तर आपल्याकडचं वाहन एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेता येत नाही. पण रो–रो सेवेच्या माध्यमातून वाहन बोटीवर चढवलं जातं आणि एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेलं जातं.

गुजरातमधल्या या फेरी सेवेमुळे एका वेळी १०० पेक्षा जास्त वाहनं आणि जवळपास २५० प्रवासी बोटीतून प्रवास करू शकतील. मोठे ट्रक, गाड्या, बस अशी वाहनं फेरीमधून नेणं आता शक्य होणार आहे. घोगा हे बंदर भावनगर जिल्ह्यात आहे. तर दहेज भरूचमध्ये आहे. ही फेरी सेवा या दोन्ही जिल्ह्यांना जोडते. यापुढच्या टप्प्यात खंबातचं आखात आणि कच्छचं आखात या दरम्यानही ही सेवा सुरू करण्यात येणार आहे. शिवाय मुंबई आणि दक्षिणेतल्या इतर बंदरांनाही रो–रो फेरी सेवेच्या माध्यमातून जोडलं जाणार आहे. यामुळे वाहनांची ने–आण करणं सोपं जाणार आहे. या प्रकल्पासाठी तब्बल ६१४ कोटी रूपयांचा खर्च आला. या सेवेमुळे घोघा आणि दहेज या दोन बंदरांमधल्या प्रवासाचा वेळ वाचतो. या दोन बंदरांमुळे दक्षिण गुजरात आणि सौराष्ट्र एकमेकांना जोडले जातात. या प्रवासासाठी आठ तास लागत असत. पण फेरी सेवेमुळे हा वेळ अवघ्या एक तासावर आला आहे. या सेवेमुळे इंधन आणि वेळ या दोन्हीची बचत होते.



## फ्लू झाला तर...

हेल्थ वेल्थ

सर्दी,खोकला, ताप असेल तर शाळेत न गेलेलं चांगलं. हा फ्लूसुद्धा असू शकतो. फ्लू म्हणजे एन्फ्लूएंझा. हा साथीचा आजार आहे. या रोगाचे जंतू हवेच्या माध्यमातून सगळीकडे पसरतात. शिंकल्यावर तसंच खोकल्यावर हे जंतू हवेत पसरतात आणि आसपासच्या लोकांनाही फ्लू होऊ शकतो. त्यामुळे फ्लू झाल्यावर शक्यतो घरात थांबायला हवं.

कफ, घसा खवखवणं, नाक गळणं, अंग दुखणं, डोकं दुखणं, दमल्यासारखं वाटणं ही फ्लूची लक्षणं असतात. फ्लूच्या जंतूमुळे जुलाब, उलट्यांसारख्या समस्याही निर्माण होतात. फ्लू झाल्यानंतर घरी राहिल्याने या रोगाचा फैलाव रोखता येतो. तसंच आराम केल्यामुळे हा रोग लवकर बरा होतो.

सर्दी, खोकला, डोकेदुखीसारखी लक्षणं दिसत असतील तर डॉक्टरांकडे जाऊन औषधं घ्या. लक्षणं फ्लूची असली तरी तुम्हाला फ्लू असेलच असं नाही. त्यामुळे डॉक्टरांकडून तपासणी करून घेणं गरजेचं आहे. गर्दीच्या ठिकाणी जाऊ नका. घरी थांबा. तुमच्या खोलीत आराम करा. शिंकताना, खोकताना तोंडावर हात ठेवा. आराम करा.



भरपूर पाणी प्या. पूर्ण बरं घराबाहेर जाऊ नका. औषधं वेळेवर घ्या.

युवाराष्ट्र दर्शन
# भंडारा
जिल्हा
रविवार दि.०८ फेब्रुवारी २०२६

## स्कील कॉम्पिटिशन स्पर्धेत शासकीय औद्योगिक संस्था भंडारा राज्यात प्रथम

**भंडारा :** कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभाग, महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी (MSSDS) यांच्या वतीने आयोजित 'महाराष्ट्र राज्य कौशल्य स्पर्धेत शासकीय आय टी आय भंडारा च्या प्रशिक्षणार्थ्यांनी दैदीप्यमान यश संपादन केले आहे. या स्पर्धेत संस्थेच्या प्रशिक्षणार्थ्यांनी ४ सुवर्ण आणि १ रौप्य अशी एकूण ५ पदके पटकावून संपूर्ण महाराष्ट्रात राज्यात कोणत्याही एका संस्थेने सर्वाधिक पदके मिळवण्याचा बहुमान मिळवला आहे.

या यशाची मुहूर्तमेढ गेल्या महिन्यात नागपूर येथे झालेल्या विभाग स्तर स्पर्धेत रोवली गेली होती. नागपूर क्लस्टरमधून या संस्थेच्या अठरा गुणवंत प्रशिक्षणार्थी राज्यस्तरासाठी निवड झाली होती. हे सर्व प्रशिक्षणार्थी १ फेब्रुवारी ते ४ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत डॉन बॉस्को लर्निंग सेंटर, कुर्ला (मुंबई) येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय स्पर्धेत सहभागी झाले होते. या अटीतटीच्या स्पर्धेत आपल्या कौशल्याने परीक्षकांची मने जिंकत आपल्या कौशल्याच्या जोरावर सुवर्ण पदक विशाखा पागोटे ट्रेड टर्नर, निशांत नागपुरे ट्रेड टर्नर, अमित बिल्लोरे ट्रेड मेकॅनिक मोटार व्हेईकलस, रितेश बालपांडे ट्रेड रेफ्रिजरेशन आणि एअर कंडिशनिंग टेक्निशिअन तर रौप्य पदक भूषण काठगाये ट्रेड मेकॅनिक मोटार व्हेईकल यांनी पदकांची कमाई केली.

युवाराष्ट्र दर्शन
पत्रकार होण्याची सुवर्णसंधी
दैनिक युवाराष्ट्र दर्शन
वृत्तपत्राकरीता भंडारा जिल्ह्यातील लाखनी, लाखांदुर,पवनी येथे तालुका व शहर प्रतिनिधी नेमणे आहे. तसेच गाव पातळीवर वार्ताहर नियुक्त करणे आहे.
संपर्क मो.: ९९२३०७०३९२

# भिलेवाडा येथील सौरऊर्जा प्रकल्प कुणाच्या फायद्याचा !

- उपसरपंच लोकेश बांते यांचा सवाल
- आ.भोंडेकर यांना बदनाम करण्याचा प्रयत्न



युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**भंडारा :** तालुक्यातील ग्राम भिलेवाडा परिसरात उभारण्यात येणाऱ्या मुख्यमंत्री कृषी सौर ऊर्जा प्रकल्पाचा भिलेवाडा येथील ग्रामस्थांना किंवा ग्राम पंचायतीला काही एक फायदा होणार नसुन फक्त वरिष्ठांना खुश करण्यासाठी हा प्रकल्प भिलेवाडा येथे उभारला जात आहे मात्र या प्रकल्पाला ग्राम पंचायतीचा पुर्णपणे विरोध असुन तसा ठरावसुध्दा ग्राम पंचायतीत पारित करण्यात आला आहे.मात्र तरिसुध्दा काही राजकीय मंडळी हा प्रकल्प भिलेवाडा येथेच सुरू व्हावा याकरीता अट्टाहास करीत असुन या प्रकल्पा आडुन मोठी आर्थिक देवाण-घेवाण झाल्याची चर्चा असल्याचा आरोप भिलेवाडा येथील ग्राम पंचायतीचे उपसरपंच लोकेश बांते यांनी आज भंडारा येथे आयोजित पत्रकार परिषदेतुन केला आहे.

भिलेवाडा येथे उभारण्यात येणाऱ्या मुख्यमंत्री कृषी सौर ऊर्जा प्रकल्पासाठी जवळपास १२ एकर जागा अधिग्रहित करण्यात येणार आहे.सदर जागा हि जनावरांना चराई, वसतीगृह, क्रिडांगण,नागरी वस्ती याकरीता ग्राम पंचायतीने राखीव ठेवली असुन या जागेव्यतिरिक्त ग्राम पंचायतीकडे अन्य दुसरी जागा उपलब्ध नसल्याने भविष्यात भिलेवाडा येथील नागरीकांना जागेची आवश्यकता भासल्यास जागा कुठून आणायची असा प्रश्न ग्राम पंचायत प्रशासनासमोर उभा ठाकल्याने ग्राम पंचायत प्रशासनाने सदर सौर उर्जा प्रकल्पाला जागा न देण्याचा निर्णय घेतला आहे.मात्र तरीसुध्दा संबंधीत कंपनीने सदर प्रकल्पाचे भूमिपुजन केले.त्या विरोधात आम्ही भंडारा जिल्हाधिकारी यांना तीनवेळा निवेदन देत सदर प्रकल्पाला आमचा विरोध असुन प्रकल्पाचे काम बंद करण्याची विनंती केली मात्र त्यावर कुठलीही कारवाई करण्यात आली नाही. त्यामुळे या विषयी आमदार नरेंद्र भोंडेकर यांची भेट घेवुन आमची भूमिका स्पष्ट केल्याने आ.भोंडेकर यांनी स्वतः प्रकल्पास्थळी भेट देत गावकऱ्यांचे म्हणणे जाणुन घेतले.त्यावेळी आ.भोंडेकर यांनी कुणाविषयीही अपशब्द वापरले नसुन त्यांना बदनाम करण्याचा प्रयत्न काही राजकीय मंडळीकडुन केला जात असल्याचे लोकेश बांते यांनी यावेळी सांगीतले.

जिल्हा परिषद गटनेते विनोद बांते यांच्यासह तालुकाध्यक्ष व अन्य पदाधिकाऱ्यांनी पत्रकार परिषद घेत आ. भोंडेकरांविषयी नाराजी व्यक्त केली होती. आ. नेत्यांना आणि आमदारांना अपमानास्पद बोलतात असा आरोपही केला गेला होता. याचावेळी त्यांनी भिलेवाडा या गावात सुरू असलेल्या सौर ऊर्जा प्रकल्पासंदर्भात आमदार हस्तक्षेप करीत असल्याचा आरोप केला होता. दरम्यान यात पार्श्वभूमीवर शिवसेनेच्या वतीने पत्रकार परिषद घेण्यात आली. भिलेवाडा गावचे उपसरपंच लोकेश बांते यांनी पत्रकार परिषदेला संबोधित केले.

पत्रकार परिषदेला लोकेश बांते यांच्यासह ग्राप सदस्य अनमोल रामटेके,सोनु बांते, राकेश बांते, शिवसेनेचे सुरेश धुर्वे,नरेश झलके, शैलेश श्रीवास्तव,प्रमोद सार्वे,विकास मदनकर, मनोज बोरकर,कैलाश तांडेकर आदि उपस्थित होते.

## बहिरंगेश्वर मंदिराला मिळणार 'ब' वर्ग तीर्थस्थळाचा दर्जा

भंडारा नगर पालिकेच्या पहिल्याच सभेत निर्णय!



युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**भंडारा :** सत्ता स्थापन झाल्यानंतर भंडारा नगरपरिषदेत पहिल्या विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. भंडारा शहराचे ग्रामदैवत असलेल्या भगवान बहिरंगेश्वर मंदिराला ब वर्ग तीर्थक्षेत्रात समाविष्ट करण्या संदर्भात महत्त्वाचा निर्णय घेत तसा प्रस्ताव सादर करण्याचे ठरविण्यात आले. सोबतच नगरपालिकेच्या नवीन इमारतीचा ठरावही या सभेत घेतला गेला.

चार वर्षाच्या प्रशासकीय काळानंतर भंडारा नगरपालिकेत सत्ता स्थापन झाली आहे. सत्ता स्थापन झाल्यानंतर पहिल्या विशेष सभेचे आयोजन ६ फेब्रुवारी रोजी नगरपरिषदेच्या सभागृहात करण्यात आले होते. ही पहिलीच सभा अनेक महत्त्वाच्या निर्णयांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरली.

भंडारा शहरातील तीन तीर्थस्थळांना तीर्थक्षेत्र स्थानांचा दर्जा देण्याचा निर्णय घेण्यात आला. यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविण्याची सवार्नुमते ठरविण्यात आले. भंडाऱ्याचे आराध्य दैवत असलेल्या भगवान बहिरंगेश्वर मंदिराचा ब वर्ग तीर्थक्षेत्रात तर श्री चक्रधर स्वामी मंदिर व शीतला माता मंदिराचा क वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा देण्यासंदर्भात निर्णय घेण्यात आला. हा प्रस्ताव आता शासनाला पाठविला जाणार आहे.

शहरातील म्हाडा कॉलनी परिसरातील एक बगीचा वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत नमो उद्यान म्हणून विकसित करण्याचा निर्णय घेण्यात आला. सद्यस्थितीत गांधी चौकात असलेली नगर परिषदेची इमारत सोयीची नाही. त्यामुळे नवीन प्रशासकीय इमारतीची वैशिष्ट्यपूर्ण योजने अंतर्गत नवीन इमारत बांधकामासाठी शासनाकडून निधी मंजूर आणण्यासंदर्भात या सभेत प्रस्तावना मंजुरी देण्यात आली. विद्युत, पाणीपुरवठा, आरोग्य, शिक्षण अशा इतरही विषयातील महत्त्वाचे निर्णय या सभेत घेण्यात. नगराध्यक्षा मधुरा मदनकर, उपाध्यक्षा भोपे, मुख्याधिकारी जुम्मा प्यारेवाले आणि अन्य पदाधिकारी व नगरसेवकांचे उपस्थितीत ही विशेष सभा संपन्न झाली.

## 'संत श्री तुकाराम महाराज' जयंतीचा शासकीय यादीत समावेश करा !

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना माजी खासदार सुनील मेंढे यांच्या नेतृत्वात शिष्टमंडळाचे निवेदन



युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**भंडारा :** जगद्गुरु संत श्री. तुकाराम महाराज यांच्या जयंतीचा समावेश २०२६ च्या शासकीय जयंती कार्यक्रमांच्या यादीत तातडीने करण्यात येईल, असे ठोस आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. माजी खासदार सुनील मेंढे यांच्या नेतृत्वाखाली 'सकल कुणबी समाजाच्या' शिष्टमंडळाने नागपूर येथील 'रामगिरी' या शासकीय निवासस्थानी मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन निवेदन सादर केले, त्यावेळी ते बोलत होते.

महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने २९ डिसेंबर २०२५ रोजी आगामी वर्षासाठी राष्ट्रपुरुष व थोर संतांच्या जयंती साजरी करण्याबाबतचे परिपत्रक निर्गमित केले आहे. या यादीत ४५ महनीय व्यक्तींचा समावेश करण्यात आला आहे. मात्र, ज्यांनी आपल्या अभंगवाणीतून जगाला मानवतावादाची शिकवण दिली आणि जे वारकरी संप्रदायाचा 'कळस' आहेत, त्या जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांचे नाव या यादीत नसल्याने समाजमनात तीव्र संताप व्यक्त होत आहे. "महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक जडणघडणीत तुकोबांचे स्थान सर्वोच्च आहे. त्यांचे नाव शासकीय यादीतून वगळले जाणे, हा केवळ वारकरी संप्रदायाचाच नव्हे तर समस्त महाराष्ट्राचा अवमान आहे," अशा शब्दांत शिष्टमंडळाने आपल्या भावना व्यक्त केल्या. २९ डिसेंबरच्या परिपत्रकात सुधारणा करून जगद्गुरु श्री तुकाराम महाराजांची जयंती (२ फेब्रुवारी) शासकीय स्तरावर साजरी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली.

निवेदनाची दखल घेताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संत तुकाराम महाराजांचे नाव यादीत नसल्याबद्दल आश्चर्य व्यक्त केले. तांत्रिक त्रुटी दूर करून त्यांच्या जयंतीचा समावेश त्वरित करण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी यावेळी शिष्टमंडळाला दिले.

या शिष्टमंडळात माजी खासदार सुनील मेंढे यांच्यासह शालिकराम कुकडे अध्यक्ष, बावणे कुणबी समाज, नागपूर, सदानंद इलमे अध्यक्ष, बावणे कुणबी समाज, भंडारा, किसन शेंडे कार्याध्यक्ष, बाळकृष्ण सार्वे ओबीसी जागृती मंच, बाबा पाटेकर, महेंद्र निंबार्ते संघटन सचिव, अनंत भारसाकळे संयोजक महाराष्ट्र राज्य कुणबी कृती समिती, किशोर येडे खैरे कुणबी समाज, मोरेश्वर फुंडे झाडे कुणबी समाज, राजु शिवनकर, राजेश चुटे अध्यक्ष झाडे कुणबी समाज नागपूर, सौ. ऐश्वयार्ताई चुटे, बाळाभाऊ शिंगणे संयोजक महाराष्ट्र राज्य कुणबी कृती समिती, क्षितिज ढोबळे यांसह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

शासनाने या विषयाचे गांभीर्य ओळखून वारकरी, कुणबी-ओबीसी समाज आणि शिव-शंभू प्रेमींच्या भावनांचा आदर करावा, अन्यथा जनआक्रोश निर्माण होईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

## स्प्रिंगडेल शाळेच्या विद्यार्थ्यांचे सुयश



युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**भंडारा :** यवतमाळ येथील जाजू इंटरनॅशनल स्कूल येथे नुकत्याच पार पडलेल्या राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनात सनीज स्प्रिंग डेल शाळेच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले.

या प्रदर्शनात शाळेतील इयत्ता नववी मधील विद्यार्थी तुरन्नू हातेवार याने उत्कृष्ट प्रकल्प सादर करत प्रथम क्रमांक पटकावला. त्याला टॅबलेट व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच या प्रदर्शनात सहभागी झालेल्या इतर विद्यार्थ्यांनाही प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली.

या यशाबद्दल शाळेच्या शैक्षणिक संचालिका सौ.अनघा पदवाड,प्राचार्या कुमारी शेफाली पाल, प्रायमरी इन्चार्य सौ.

गंगाखेडकर, केजी इन्चार्ज सौ. कल्पना जांगडे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. तसेच शाळेतील शिक्षक वृंदा ने ही यात मोलाचे योगदान दिले. विद्यार्थ्यांच्या या घवघवीत यशामुळे शाळेच्या शैक्षणिक कार्याचा नावलौकिक वाढला आहे.

## १.६९ लाखांनी गंडविले

**भंडारा :** तुमच्या नावाने गॅस एजन्सीसाठी डीलरशिप म्हणून निवड झाली आहे. असे सांगून विश्वास संपादन केला. तसेच टप्प्याटप्याने ऑनलाईन पद्धतीने तब्बल १ लाख ६९ हजार रुपये खात्यात वळती करवून घेतले. यात शेवटी आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच तरुणाने भंडारा पोलिसात धाव घेतली. राकेश यादवराव चौरागडे रा. सातोना असे फसवणूक झालेल्या तरूणाचे नाव आहे. तक्रारीवरून सायबर पोलिसांनी रमेश कांबळे या इसमाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## तुमसर शहराला 'अत्याधुनिक सीसीटीव्ही कॅमेरा' सुरक्षेचे कवच



युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**तुमसर :** शहरातील कायदा व सुव्यवस्था अधिक बळकट करण्याच्या दृष्टीने तुमसर शहरात ४० अत्याधुनिक सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. आमदार राजू कारेमोरे यांच्या विशेष प्रयत्नातून आणि नवनियुक्त नगराध्यक्ष इंजि. सागर गभने यांच्या कार्यतत्परतेतून हा प्रकल्प पूर्णत्वास आला असून, नुकताच याचा लोकार्पण सोहळा उत्साहात पार पडला.

स्थानिक नागरी सेवा सुविधा योजनेअंतर्गत नगरपरिषदेने शहरातील अत्यंत वर्दळीच्या १४ मुख्य ठिकाणांची निवड केली आहे. यामध्ये राजाराम हॉल परिसर, कृषी उत्पन्न बाजार समिती समोर (हसारा फाटा), मोठा बाजार, सिहोरा रोड, बस स्टॉप, रेल्वे टाऊन, शिवनी रोड, शिव मंदिर चौक, माळवीय नगर, लोटन पोहा चौक, पिपरा रोड, जैन मंदिर परिसर, बोरी रोड आणि पतंजली रोड या ठिकाणांचा समावेश आहे. या १४ केंद्रांवर एकूण ४० कॅमेरे बसवण्यात आले असून, त्यांचे मुख्य नियंत्रण केंद्र कार्यान्वित करण्यात आले आहे.

या उद्घाटन समारंभाला आमदार राजू कारेमोरे, नगराध्यक्ष इंजि.सागर गभने,सचिन बोपचे उपाध्यक्ष.न.प,पोलीस निरीक्षक संजय गायकवाड, सतीश सोनवणे प्रामुख्याने उपस्थित होते. तसेच प्रदीप भरणेकर, राहुल रणदिवे, बापू बडवाईक, जमील शेख, भावेश पाल, दीपक लुटे, हर्षल चौधरी यांच्यासह अनेक मान्यवर, नगरपरिषद कर्मचारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्राणघातक हल्ला करणाऱ्या आरोपीला पाच वर्षे कारावासाची शिक्षा

जिल्हा सत्र न्यायालयाचा निकाल



युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**साकोली :** क्षुल्लक कारणावरून झालेल्या वादातून चाकूने हल्ला करून गंभीर जखमी केल्याच्या प्रकरणात आरोपीला पाच वर्षांची शिक्षा सुनावण्यात आली आहे. चांदोरी/ उसगाव (ता. साकोली, जि. भंडारा) येथील रहिवासी मोहनलाल ईसन मेश्राम (वय ४५) याने जिवे मारण्याच्या उद्देशाने हल्ला केल्याचे सिद्ध झाल्याने भंडारा येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाने हा निकाल दिला.

दि. २१ मार्च २०१९ रोजी घडलेल्या या घटनेत जखमी मार्कंड उर्फ पपेश हेमराज कापगते (वय ३२) याने आरोपीस 'तू माझ्या आईला शिवीगाळ का केली' असा जाब विचारल्याने वाद निर्माण झाला. याच वादातून आरोपी मोहनलाल मेश्राम याने चाकूने जखमीच्या डाव्या हाताच्या भुजेला, गळ्यावर व पोटावर वार करून गंभीर जखमी केले व जिवे मारण्याचा प्रयत्न केला. याप्रकरणी फिर्यादी दयाराम विठोबा रुखमोडे (वय ५७, रा. चांदोरी) यांच्या तोंडी तक्रारीवरून तसेच वैद्यकीय अहवालाच्या आधारे साकोली पोलीस ठाण्यात अपराध क्रमांक ८७/२०१९ अन्वये भादंवि कलम ३०७ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक रविंद्र रेवतकर यांनी केला. साकोली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक महादेव आचरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली दत्तक अधिकारी पोउपनि प्रशांत वडुले यांनी कामकाज पाहिले. सरकारी अभियोक्ता म्हणून श्री. रमाकांत खत्री यांनी सक्षम युक्तिवाद केला, तर आरोपीतर्फे वकील श्री. दिलीप भोयर यांनी बाजू मांडली. पैरवी अधिकारी पोहवा धनराज रोहनकर यांनी प्रभावी पैरवी बजावली.

दि. ७ फेब्रुवारी २०२६ रोजी मा. जिल्हा व १ अतिरिक्त सत्र न्यायाधीश भंडारा, श्री. शाह साहेब यांच्या न्यायालयाने आरोपी मोहनलाल ईसन मेश्राम यास भादंवि कलम ३०७ अंतर्गत दोषी ठरवून उफ्द्धउ २३५(२) अन्वये पाच वर्षांची सक्त मजुरी व १०,००० रुपये दंड, दंड न भरल्यास तीन महिने सक्त मजुरी अशी शिक्षा ठोठावली. या निकालामुळे गंभीर गुन्ह्यांबाबत न्यायालयाची कठोर भूमिका पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

### आज शितलामाता मंदिरात गजानन महाराज प्रकट दिन

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**भंडारा :** गजानन महाराज प्रकट दिनानिमित्त ८ फेब्रुवारीला शितलामाता मंदिर खांबतलाव भंडारा येथे पोथी वाचन व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

# भंडारा ग्रंथोत्सवातून उमटला जनकल्याणाचा स्वर

- मल्टिमिडीया प्रदर्शन आणि वैचारिक मंथनाने रसिक मंत्रमुग्ध
- जिल्हा परिषद जकातदार विद्यालयाच्या प्रांगणात दोन दिवसीय ग्रंथोत्सवाचा थाटात समारोप



युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**भंडाराः** महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक धोरणांतर्गत, ५ व ६ फेब्रुवारी २०२६ रोजी स्थानिक जिल्हा परिषद जकातदार विद्यालयाच्या भव्य प्रांगणात आयोजित 'भंडारा ग्रंथोत्सव २०२५' उत्साहात संपन्न झाला. ग्रंथदिंडी, परिसंवाद, महाचर्चा आणि कवी संमेलनाच्या माध्यमातून या दोन दिवसांत भंडारा नगरी पूर्णतः ग्रंथमय झाली होती.

**ग्रंथदिंडीने वातावरणात चैतन्य**

ग्रंथोत्सवाची सुरुवात ग्रंथपूजन व भव्य ग्रंथदिंडीने झाली. उपशिक्षणाधिकारी राहुल बावा व रमाकांत झाल्टे यांच्या उपस्थितीत जकातदार विद्यालय, महिला समाज प्राथमिक शाळा व नूतन कन्या विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी या दिंडीत सहभाग घेतला. लेझीम आणि टाळांच्या गजरात निघालेल्या या दिंडीने शहराचे लक्ष वेधून घेतले.

**जनकल्याणाचा 'मल्टिमिडीया' अविष्कार**

जिल्हा माहिती अधिकारी कार्यालयामार्फत जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत 'योजना जनकल्याणाच्या' या विषयावर मल्टिमिडीया छायाचित्र प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या प्रदर्शनाच्या माध्यमातून शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यात आली. सदर छायाचित्र प्रदर्शन हे आकर्षणाचे केंद्रबिंदू ठरले.

**स्त्रीशक्तीचा जागर**

'उपवास करायचा असेल तर मोबाईलचा करा' दुसऱ्या दिवशी 'महिला व ग्रंथालये' या विषयावर महाचर्चा रंगली. जिल्हा माहिती अधिकारी शैलजा दांदळे, सविता बेदरकर, छाया भुसारी व डॉ. ममता राऊत यांनी समाजातील ज्वलंत प्रश्नांवर भाष्य केले. 'मुलींनी केवळ नाचण्यापेक्षा वाचनाकडे वळावे' आणि 'स्त्रियांनी मोबाईलचा उपवास करून पुस्तकांशी मैत्री करावी,' असे प्रबोधनात्मक विचार यावेळी मांडण्यात आले. ग्रंथातील महापुरुष वाचकाला जीवन जगण्यासाठी बळ देतात, असे मत मान्यवरांनी व्यक्त केले.

**एकपात्री प्रयोग आणि कवी संमेलनाने जिंकली मने**

जकातदार विद्यालयाची विद्यार्थिनी कु. खुशी आदेश तितीरमारे हिने 'मी अहिल्याबाई होळकर बोलतेय' हा एकपात्री प्रयोग अत्यंत प्रभावीपणे सादर केला. त्यानंतर रंगलेल्या कवी संमेलनाचे अध्यक्षपद प्रमोदकुमार शाहू यांनी भूषवले. विजय बघेले, शफीउल्ला करीम सय्यद व जिल्ह्यातील नवोदित कवींनी सामाजिक विषयांवर आपल्या काव्यशैलीतून दाद मिळवली. या सत्रांचे बहारदार सूत्रसंचालन बाळासाहेब मुंडे यांनी केले.

**उत्कृष्टतेचा सन्मान व समारोप**

समारोपीय कार्यक्रमात जिल्हा ग्रंथालय संघ अध्यक्ष धनंजय दलाल यांच्या हस्ते 'सिल्ली' येथील प्रगती सार्वजनिक वाचनालयाचा राज्यस्तरीय पुरस्काराबद्दल सत्कार करण्यात आला. तसेच उत्कृष्ट ग्रंथपाल म्हणून घनश्याम कानतोडे व इस्तारी मेंढे यांना गौरविण्यात आले.

याप्रसंगी डॉ. सुमंत देशपांडे, मुख्याध्यापक रिना काळे, साहित्यिक हर्षल मेश्राम व जिल्हा ग्रंथालय अधिकारी खुमेंद्र बोपचे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन काका भोयर यांनी केले, तर आभार रोशन उरकुडे यांनी मानले. 'वंदे मातरम्'च्या स्वरांनी या ज्ञानयज्ञाची सांगता झाली.

## एजन्सी देणे आहे

हिंगणघाट येथे दै.युवाराष्ट्र दर्शनची एजन्सी देणे आहे. ईच्छुकांनी खालील पत्त्यावर संपर्क साधावा, वृत्तपत्र क्षेत्रातील कार्यरत व्यक्तींना प्रथम प्राध्यान्य देण्यात येईल.

आवृत्ती संपादक,
दै.महासागर, आवृत्ती कार्यालय, परमार कॉम्प्लेक्सस
हवालदारपुरा, वर्धा, मो. ९०१२०५८३७२

## एजन्सी देणे आहे

हिंगणघाट येथे दै. महासागरची एजन्सी देणे आहे. ईच्छुकांनी खालील पत्त्यावर संपर्क साधावा. वृत्तपत्र क्षेत्रातील कार्यरत व्यक्तींना प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

आवृत्ती संपादक,
दै.महासागर, आवृत्ती कार्यालय, परमार कॉम्प्लेक्सस
हवालदारपुरा, वर्धा, मो. ९०११०५८३७२

# जिल्हा परिषदेच्या तंबाखू सेवन करणाऱ्या नऊ व्यक्तींवर दंडात्मक कारवाई

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा,दि. ०७**

जिल्हा परिषदेच्या विविध विभागांमध्ये कार्यरत कर्मचारी यांच्यावर तंबाखू पदार्थ सेवन केल्याप्रकरणी दंडात्मक कार्यवाही करुन १ हजार ६५० रुपयाचा दंड वसूल केला. तंबाखूनियंत्रण समितीने ही कारवाई केली.जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुमंत वाघ व जिल्हा आरोग्य अधिकारीडॉ. स्वप्नीलबेले, जिल्हा पोलिस अधिक्षक सौरभकुमार अग्रवाल यांच्या मार्गदर्शनात राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमाच्या जिल्हा सल्लागार डॉ. नम्रता सलूजा, सायकॉलॉजिस्ट राहुल बुचुंडे, सामाजिक कार्यकर्ता हर्षद ढोबळे, पोलिस शिपाई थेमचंद कोहचडे यांनी कारवाईत भाग घेतला होता. सदर



कार्यवाही जिल्हाधिकारी वान्मथी सी, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांच्या आदेशानुसार तंबाखू नियंत्रण कायदा २००३ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी करण्यात आली. २९ मे २०२१ च्या शासन निर्णयानुसार सुपारी, पान, पानमसाला, गुटखा तसेच तंबाखूजन्य पदार्थाच्या सेवन व थुंकण्यास व धुम्रपान करण्यास मनाई तसेच सार्वजनिक ठिकाणी तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ विक्री करणे, खाणे व धूम्रपान करण्यास कोटपा कायद्यानुसार मनाई आहे. सदर कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या विविध विभागामध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांवर दंडात्मक कार्यवाही करण्यात आली असल्याचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुमंत वाघ यांनी कळविले आहे.

# विद्यार्थांचा स्पर्धापरिक्षेमधून बौद्धिक विकास - डॉ. तुळसकर



ऑलिम्पियाड परीक्षेत सुवर्णपदकप्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**समुद्रपूर,दि.०७**

स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासासोबतच आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पर्धा करण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होते, ऑलिम्पियाड परीक्षेत गोल्ड मेडल पटकावणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ कार्यक्रमात बोलतांना प्रा. डॉ. उमेश तुळसकर यांनी असे मत व्यक्त केले

स्थानिक विद्या विकास महाविद्यालयात इंटरनॅशनल इंग्लिश ऑलिंपियाड, नॅशनल सायन्स ऑलिंपियाड,इंटरनॅशनल मॅथेमॅटिक्स इंटरनॅशनल परीक्षा घेण्यात आली यामध्ये अडतीस विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता त्यात चौदा विद्यार्थ्यांना गोल्ड मेडल मिळाले.उत्कृष्ठ परिक्षा नियंत्रक म्हणून प्रा जितेंद्र तोमर,प्रा.मनोज बावणे,प्रा.वैशाली सुपारे यांना प्रोत्साहनपर प्रमाणात देण्यात आले.

महाविद्यालयात एध्इ यांच्या वतीने इंटरनॅशनल ऑलिम्पियाड परीक्षेत गोल्ड मेडल पटकावणाऱ्या विद्यार्थ्यांचा सुवर्ण पदक, प्रमाणपत्र पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी डॉ. उमेश तुळसकर, मार्गदर्शक प्राचार्य डॉ किशोरचंद रेवतकर,प्रा.जितेंद्र तोमर उपस्थित होते.यावेळी मार्गदर्शन करतात प्राचार्य रेवतकर म्हणाले की ही एक नोंदणीकृत शैक्षणिक संस्था आहे. एसओएफची स्थापना आघाडीच्या शिक्षणतज्ज्ञ, शास्त्रज्ञ आणि माध्यम व्यक्तिमत्त्वांनी केली आहे. विविध उपक्रमांद्वारे शैक्षणिक विषयांची योग्य समज वाढवण्याचा प्रयत्न ऑलिंपियाड करते.असे ते म्हणाले.

कार्यक्रमाचे संचालन प्रा.वैशाली सुपारे तर आभार प्रा मनोज बावणे, यांनी केले.या कार्यक्रमाला प्रा.नरेंद्र मेश्राम, प्रा.सतीश बेले,प्रा.सीमा तडस, प्रा.पुर्वा चांभारे,प्रा.हर्षदा डंभारे, प्रा.दिपाली कोंडमारे, प्रा.नचीकेत ठवरी,धनेश रंगारी,संजिव पवार, योगेश घटे सह विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

## निधन वार्ता

### दिनेश लोहकरे

**सिंदी (रेल्वे)-** येथील पेट्रोलपंप समीप राहणारे दिनेश लोहकरे(पायलट)(३६)यांचे



पहाटे निधन झाले. त्याच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे. त्यांचे पार्थिवावर स्थानिक मोक्षधामात अंत्यसंस्कार करण्यात आले.

# डॉ.राम बेंदूर जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा,दि. ०७**

येथील संत गजानन महाराज मंदिरामध्ये गुरुवर्य सुरेश चौधरी स्मृती प्रतिष्ठानच्यावतीने तपस्वी संगीत तज्ञ ९७ वर्षीय डॉ. राम मोहन बेंदूर यांना जीवनगौरव सन्मानाने सन्मानित करण्यात आले. यावेळी जनहित मंचाचे अध्यक्ष सतीश बावसे, संस्कार भारतीचे मंत्री मकरंद उमाळकर ,सुरेश चौधरी स्मृती प्रतिष्ठानचे विश्वस्त किरण पटेवार , गायक प्राध्यापक श्रीकांत झाडे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.



# अनधिकृत हॅकर्सद्वारे रेल्वेत खाद्यपदार्थाची विक्री

**वर्धा :** एका मध्य प्रदेशातील व्यक्तीने अनधिकृत हॉकर्सची टिम तयार करुन रेल्वेत खाद्यपदार्थ विक्रीचा व्यवसाय सुरु केला असून या खाद्यपदार्थापासून प्रवाशांच्या जिवाशी खेळ केल्या जात असल्याची चर्चा आहे.

सेवाग्राम रेल्वे स्थानकावर अनेक रेल्वे गाडयांचे अवागमन दिवसभरात होते, याचा फायदा घेत एका अनाधिकृत व्यक्तीने परवाना नसताना अनधिकृत हॉकर्स रेल्वे स्थानकांच्या प्लॅटफॉर्मवर तसेच रेल्वेच्या डब्यात खाद्यपदार्थ, चाय, पाणी, बॉटल व इतर वस्तू विक्रीसाठी लावलेले आहेत, परवाना नसल्यामुळे विक्री होणाऱ्या खाद्यपदार्थ दर्जेदार आहे की, नाही याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे,

सेवाग्राम रेल्वे स्थानकावर काही प्रमाणात परवानाधारक हॉकर्स आहे, मात्र, त्यापेक्षा दुप्पटीने परवाना नसणाऱ्या हॉकर्सचा बोलबाला या रेल्वे स्थानकावर असून येथील पोलिस अधिकारी असा कोणताही प्रकार घडत नसल्याचे सांगतात, हे विशेष !

# आमगाव येथे द्विदिवसीय शिबिर

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा,दि. ७**

महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय, समाज कार्य संस्थान अंतर्गत एम.एस.डब्ल्यू. व बी.एस.डब्ल्यू. अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी ग्राम आमगाव येथे द्विदिवसीय ग्रामीण शिबिराचे आयोजन करण्यात आले. निदेशक डॉ. के. बालराजु यांनी हिरवी झेंडा दाखवून विद्यार्थ्यांना रवाना केले. शिबिराचे संयोजन डॉ. शिव सिंह बघेल यांनी केले. सहसंयोजक म्हणून डॉ. शिवाजी जोगदंड उपस्थित होते.




शिबिराचे उद्घाटन दीपप्रज्ज्वलन करून करण्यात आले. यावेळी ग्रामीण शिबिर मार्गदर्शक डॉ. शिव सिंह बघेल यांनी शिबिराची उद्दिष्टे, नियम व शिस्तीबाबत महत्त्वपूर्ण सूचना दिल्या.

उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी आमगावच्या सरपंच शालिनी वानखेडे होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांना समाज कार्य क्षेत्रात निष्ठा, संवेदनशीलता व सेवा भावनेने कार्य करण्याचा संदेश दिला.या प्रसंगी व्यासपीठावर डॉ. शिवाजी जोगदंड, अंगणवाडी सेविका वर्षा गौळकर व सहायिका संगीता चांदोरे उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे संचालन साक्षी मेंढे यांनी केले, तर यशस्वी मांडवकर यांनी आभार मानले.ग्रामीण शिबिर विद्यार्थ्यांना ग्रामीण जीवन, सामाजिक रचना व स्थानिक समस्यांची प्रत्यक्ष समज मिळवून देणारे ठरत आहे.

# तालुक्यातील विविध कामाचे लोकार्पण व भूमीपूजन

## पालकमंत्री डॉ.भोयर यांच्या हस्ते

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि.७सेलू**

पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्या हस्ते आज तालुक्यातील आमगाव (ख) ते गणेशपूर खापरी (ढोणे) येथील ३० लक्ष रुपयाच्या खडीकरण रस्ता बांधकाम, हिंगणी येथील आपले सरकार सेवा केंद्र, पांदन रस्ता, पुलाचे बांधकाम, नाली बांधकामाचे भूमीपूजन तसेच घनकचरा व्यवस्थापन अशा १ कोटी ३७ लक्ष रुपये व येळाकेळी येथील ४० लक्ष रुपयाच्या रस्ता बांधकामाचे भूमीपूजन व महिला बचत गट भवनाचे लोकार्पण करण्यात आले.

विविध कामाचे भूमीपूजन व लोकार्पण खडकी येथील हनुमान देवस्थान येथे सभागृहात आयोजन करण्यात आले होते. यावेळी माजी आमदार सुधाकर कोहळे, तहसिलदार शंकुतला पाराजे, अशोक मुडे, अशोक कलोडे, प्रफुल खोडे, आमगावचे सरपंच राजेश लोणकर, हिंगणीच्या सरपंच दामिनी डेकाटे, ज्योती घंगारे आदी उपस्थित होते. यावेळी डॉ. पंकज भोयर म्हणाले, हिंगणी या छोट्या ग्रामपंचायतींनी व्यवस्थित नियोजन करुन घनकचरा व्यवस्थापन केले, ही ग्रामपंचायतीसाठी अभिमानाची बाब आहे. हिंगणी



येथे नव्याने बांधण्यात आलेली प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत जिल्ह्यातच नव्हे तर विदर्भातील सुसज्ज इमारत असल्याचे सांगून येथे येणाऱ्या रुग्णांसाठी अत्याधुनिक शस्त्रक्रिया कक्षाची निर्मिती करण्यासाठी प्रयत्न करणार. लवकरच सिंदी ड्रायपोर्ट तयार होणार असून या ड्रायपोर्टमध्ये पदवीधरांना नोकरीची संधी उपलब्ध होणार आहे. यासाठी सेलू तालुक्यातील पदवीधरांनी पदवीधर मतदारसंघाच्या मतदार यादीत नाव नोंदणी करुन घ्यावी, असे आवाहन पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी केले. वर्धा जिल्ह्यात २० कोटी रुपये खर्च करुन उमेद मॉल तयार करण्यासाठी शासनाने मंजूरी दिली असून भविष्यात यामध्ये वाढ करुन ५० कोटी रुपये मंजूर करण्यासाठी प्रयत्न करणार. यामुळे जिल्ह्यातील बचत गटाच्या उत्पादित मालाला बाजारपेठ मिळून गटातील महिला सक्षम होण्यास मदत होईल, असेही पुढे बोलतांना डॉ. पंकज भोयर म्हणाले.माजी आमदार सुधाकर कोहळे म्हणाले, नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाच्या मतदार नोंदणीमध्ये वर्धा जिल्ह्यातील नोंदणी कमी असून यासाठी जिल्ह्यातील पदवीधरांनी मतदार यादीत नाव नोंदणी करण्यासाठी अर्ज भरुन घ्यावे, असे आवाहन केले. येळाकेळी येथील रस्त्याच्या भूमीपुजन व बचतगट भवन कार्यक्रमास येळाकेळीच्या सरपंच भारती चलाख, उमरीचे सरपंच सचिन खोसे, सयाजी महाराज, सोनाली कलोडे आदी उपस्थित होते.

# शिक्षकांच्या बदल्या ३१मे पुर्वी होणार

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी


**आर्वी,दि.०७**

जिल्हा परिषद शाळामधील शिक्षकांच्या बदल्या यंदा३१मे पुर्वी होणार ाहेत.१०फेब्रुवारी२०२६ पर्यंत संचमान्यता अंतिम होऊन ,शाळेच्या पटसंख्येनुसार अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे पहिल्यांदा समायोजन होईल, त्यानंतर शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदल्या आणि नंतरच जिल्हाअंतर्गत बदल्या होतील; असे स्पष्ट संकेत वरिष्ठ पातळीवरुन दिसून येते. वर्धा जिल्हा परिषदेच्या शाळांची संख्या जास्त असुन, पाहिजे त्या प्रमाणात तूर्तास शिक्षक उपलब्ध नाहीत. त्यामुळे आता३१मे पुर्वी शिक्षक भरती होणार असल्याचे संकेत मिळत आहे.

तात्पर्य शेवटी ८०टक्के निकषाप्रमाणे शिक्षकांची रिक्त पदे भरली जातील, अशीही माहिती शिक्षण विभागाच्या सूत्रांनी प्रतिनिधीला दिली आहेत.


वर्धा जिल्हा परिषदेच्या सुमारे९००च्या वर शाळा असुन जिल्हा परिषदेच्या अनेक शाळा एकशिक्षकी असुन त्यातही २०पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांचा आकडा, दिवसेंदिवस वाढत आहे.त्यातच या कमी पटसंख्येच्या शाळामधील विद्यार्थ्यांना दुसऱ्या शाळामधील शिक्षक पर्यायी व्यवस्था होईपर्यंत तात्पुरत्या स्वरूपात अध्यापन करीत आहेत.

१५मार्च२०२४च्या शासन निर्णयानुसार पहिल्यांदा संचमान्यता अंतिम झाल्याने हजारो शिक्षक पटसंख्येच्या अभावी अतिरिक्त होतील आणि नव्या शिक्षक भरतीत देखील पदे कमी होतील, असा अंदाज वर्तविला जात आहेत. या पुष्ठभूमीवर वर्धा जिल्हासह राज्यातील सर्वच शिक्षकांचे संचमान्यतेकडे लक्ष लागले आहे.पहिल्यांदा अतिरिक्त शिक्षकांचे होणार आधी समायोजनबदल्या करण्यापूर्वी जे अतिरिक्त शिक्षक आहेत, त्याना त्याच्या सेवाज्येष्ठता नुसार व जेथे रिक्त जागा असेल तेथे त्यांना पदस्थापणा मिळणार आहेत. तसेच यंदा ३१मे पुर्वी शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदल्या व त्यानंतरच जिल्हाअंतर्गत बदल्या होतील. जिल्हा परिषदेतील अंदाजे ७००पर्यंत शिक्षकांच्या बदल्या होणार आहे. परंतु २०२६च्या जणगणेचा बदल्यासाठी मोठा अडसर ठरु शकतो, हेही तेवढे खरे !




जिल्हा परिषदेच्या शिक्षकांच्या बदल्या करण्याचा निर्णय ग्रामविकासविभाग आणि शिक्षणविभागाच्या अख्यत्यारित येत असतो!त्यानुसार हे विभाग शिक्षकांच्या बदल्या अतिशय पारदर्शक पध्दतीने करतात, परंतु बदलीधोरणात पारदर्शकता येण्यासाठी संवर्ग १मध्ये येणाऱ्या शिक्षकांची वैद्यकीय प्रमाणपत्रे तपासून ती योग्य की अयोग्य याचीही शहयनिशा झाली पाहिजे, त्यासाठी नामवंत वैद्यकीय टिमचे मार्गदर्शन घेऊन त्या संवर्गातील शिक्षकांची माहिती तपासली पाहिजे,

**अविनाश ल.टाके शिक्षक आर्वी जि.वर्धा**



बदलीधोरणात अनेकांना फायदा होत असलात तरीही नवोदित शिक्षकांना बदल्या मध्ये मोठा फटका बसतो, संवर्ग १आणि संवर्ग२या प्रवर्गातील शिक्षक, शिक्षिकांना तालुक्यातील आणि जिल्ह्यातील शिक्षकांना अतिशय जवळची गावे मिळतात, परंतु संवर्ग४मधील नवख्या शिक्षकांना बदलीधोरणात फटका बसतो!त्यामुळे बदलीधोरणात अधिक पारदर्शकता आणण्यासाठी निर्णय घेणे आवश्यक आहेत. तसेच संवर्ग१चा लाभ घेणाऱ्या शिक्षकांना ,दुसऱ्यांदा लाभ मिळता, का-मा नयेत.एकंदरीत शासनाचे बदलीधोरण अतिशय पारदर्शक आहेत,

**उमेशकुमार आसटकर आदर्श/गुणवंत शिक्षक आर्वी**



शिक्षकांच्या बदलीधोरणात एकवाक्यता आणि सुसूत्रता असल्याने अनेक शिक्षकांना आपल्या सोईनुसार बदलीचे ठिकाणी जाता येते. बदलीमध्ये संवर्ग १,२,३,४ असे गट पडले आहेत. परंतु यामध्ये संवर्ग४च्या एकल शिक्षकावर अन्याय होत असल्याचे दिसून येते; त्यामुळे बदलीधोरणात संवर्ग ४कडे लक्ष देवुन खोटी माहिती देणाऱ्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी,


**मंगेश कोल्हे,मुख्याध्यापक जि.प.शाळा नेरी**

# साध्या उपासनेनेही भगवान शिव प्रसन्न होतात - भागवताचार्य

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**देवळी ,दि.०७**

शिवपुराणानुसार, महादेवांना देवाधिदेवाचा दर्जा आहे आणि त्रिमूर्तीमध्ये शिवाला सर्वात शक्तिशाली मानले जाते. भगवान शिवाची खऱ्या मनाने आणि भक्तीने पूजा केल्यास त्याचे फळ निश्चितच मिळते. भगवान शिव अतिशय निष्पाप आहेत, म्हणून त्यांना भोलेनाथ आणि भोले भंडारी या नावांनीही ओळखले जाते. साध्या उपासनेनेही भगवान शिव लवकर प्रसन्न होतात. जर एखाद्या भक्ताने शिवलिंगाला शुद्ध पाण्याचे भांडेही खऱ्या मनाने अर्पण केले तर त्याला त्याचा नक्कीच फायदा होतो असे यावेळी भागवताचार्य ह.भ.प. सोनाली दिदी महाजन यांनी शिवपुरानाची महती सांगितली.



देवळी येथे योगीराज संत श्री. गजानन महाराज सेवामंडळव्दारे शिवमहापुरान सप्ताहात भागवताचार्य ह.भ.प. सोनाली दिदी महाजन यांनी अमृतवाणीतून शिवमहापुराण कथेचा सार समाजावून सांगितला.

कार्यक्रमाला माजी खासदार रामदास तडस, माजी नगराध्यक्ष शोभा तडस, उपाध्यक्ष राहुल चोपडा, माजी सभापती तथा नगरसेवक विलास जोशी, शिक्षण सभापती शुंभागी कुर्जेकर, महिला व बालकल्याण उपसभापती ज्योती खाडे, नगर सेविका सुरेखा कारोटकर, विभावरी बजाईत, नगरसेविका विश्वजिता पोटदुखे, ललीता धुर्वे, स्विकृत सदस्य रवी कारोटकर उपस्थीत होते, यावेळी मान्यरांच्या हस्ते संत श्री. गजानन महाराज सेवामंडळ देवळी व्दारा नवनिर्वाचीत सभापती व नगरसेवकांचा शाल, श्रिफळ देवुन सत्कार करण्यात आला.कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता संत श्री. गजानन महाराज सेवामंडळ देवळीचे अध्यक्ष उमेश कामडी, ज्ञानेश्वर दुरगुडे, संजय शहारे,अवधुत खांडेकर, किसनाजी उगेमुगे, शंकर जबडे,अतुल कामडी,नाना शहारे, प्रणय ढोक यांनी प्रयत्न केले. कार्यक्रसाठी मोठया संख्येने देवळीकर नागरिक उपस्थित होते.

